# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 17/03/2021 (बुधवार)
(सायंकाळ)

---

### पोलीस स्टेशन बेला तर्फे मास्क चे वाटप व मास्क न वापरनाऱ्यांवर कारवाई

सद्या नागपूर जिल्हयात कोरोनाचा वाढत प्रदुर्भाव लक्षात घेता व ग्रामीण भागात कोरोणाचा शिरकाव होवु नये करीता श्री. राकेश ओला, पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामीण, साहेबांनी ग्रामीण भागात नागरीक मास्कचा वापर करीत नसल्याचे त्यांचे लक्षात आल्यावर त्यांनी पोलीस प्रशासनाला नागरीकांना मास्क वापरण्यासाठी जनजागृती करून त्रीसुत्री कार्यक्रमं अंमलात आणण्यासाठी आदेश पोलीस प्रशासनाला दिले आहेत. सदर आदेशाचे अनषंगाणे मा. पोलीस अधिक्षक श्री राकेश ओला, अपर पोलीस अधिक्षक श्री. राहुल माकनिकर तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. राजेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन बेला तर्फे बेला येथील कोरोनाचे वाढत्या रूग्नांवर नियंत्रण ठेवण्यासाठी त्यानुसार मास्कचा वापर, सेनिटायझर चा वापर आणी सुरक्षित अंतर या त्रिसुत्रीचा वापर केल्यावरच आपण कोरोणा या रोगापासुन बचाव करू शकतो. या अनुशंगाने बेला पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्री. पंकज वाघोडे व पोलीस अंमलदार यांनी बेला शहराचे हद्दीमध्ये गरीब गरजु 150 लोकांना मास्कचे वाटप केले तसेच मास्क न वापरनाऱ्या व्यवसायीकांवर दंडात्मक कार्यवाही देखील केली. कोरोणाचा प्रादुर्भाव थांबविण्यासाठी वारंवार नागरीकांना समजावुन देखील कायद्याचे उल्घंन करणारे अशा नागरीकांवर दि. 16/03/2021 व दि. 17/03/2021 रोजी एकुण 33 मास्क न वापरनाऱ्यांवर कारवाई करून 6,600/– रूपयाचा दंड वसुल केला असुन पुढेही दंडात्मक कारवाई करणार असल्याचे त्यांनी सांगीतले आहे. दररोज सकाळ आणी संध्याकाळ दोन वेळेस विणा मास्क फिरनाऱ्यांवर कसुन कारवाई केली जात आहे. कोनीही विणा मास्क घराबाहेर पडु नये असे आव्हाण पोलीस स्टेशन बेला तर्फे केले आहे. सदर कारवाईमध्ये नायब तहसीलदार नंदेश्वर मॅडम बेला व महसुल चे कर्मचारी, ग्रामपंचायत चे अधिकारी कर्मचारी तसेच वैद्यकीय अधिकारी श्री. स्वप्नील डडमल, विकास ढोक यांचे विशेष सहकार्य मिळाले.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर